पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, पिंपरी चिंचवड-४११०३३
दुरध्वनी क्रमांक-२७३५०५५५

क्र. आस्था-२/प्रलि/पोलीस भरती – २०२१/प्रसिध्दीपत्रक /२०२३ पिंपरी चिंचवड दिनांक २९/०१/२०२३.

## पोलीस भरती- २०२१

## प्रसिध्दीपत्रक

मा. पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील आदेशास अनुसरुन पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड आस्थापनेवर पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता दिनांक ३०/०१/२०२३ ते ०६/०२/२०२३ या कालावधीत राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ०२, वानवडी, हडपसर, पुणे येथील मैदानावर भरती प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

सदर भरतीसाठी येणा-या उमेदवारांना आवाहन करण्यात येते की, सदरची पोलीस भरती प्रक्रिया ही मा. श्री. विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड व मा. श्री. मनोज लोहिया, पोलीस सह आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली व डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे अध्यक्षतेखाली पुर्णपणे पारदर्शक पध्दतीने पार पाडली जात आहे. त्यामुळे भरतीसाठी कोणाच्याही प्रलोभनाला बळी पडू नये. जर कोणी व्यक्ती भरती करुन देणेबाबत अमिष दाखवत असेल तर अशा व्यक्तींच्या भुलथापांना बळी न पडता सदर व्यक्तीबाबत खालील नमुद दक्षता अधिकारी (व्हिजिलन्स ऑफिसर) यांना संपर्क साधून कळवावे. संबंधित व्यक्तींचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे आवाहन पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे मार्फेत करण्यात येत आहे.

सर्व उमेदवार यांनी त्यांना महा- आयटी ( **MAHA-IT** ) यांचेकडून ऑनलाईन अदा करण्यात आलेल्या प्रवेशपत्रावरील सुचनांचे पालन करुन **दिलेल्या तारखेस पहाटे ०५.०० वा.चे पुर्वी भरती प्रक्रियेसाठी उपस्थित रहावे.** उमेदवारास देण्यात आलेल्या तारखेस उमेदवार भरती प्रकियेसाठी उपस्थित राहू शकला नाही तर त्यास कोणत्याही परिस्थितीत तारीख बदलून दिली जाणार नाही अथवा संधी उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

तसेच उमेदवार यांनी भरती प्रक्रियेसाठी येत असताना आवेदन अर्जाच्या व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित / साक्षांकित प्रतीचे २ सेट (संच )सोबत ठेवावेत. तसेच आयकार्ड साईजचे १० फोटो आणावेत.

| अ.नं. | दक्षता अधिकारी ( व्हीजीलंन्स ऑफीसरचे नांव ) | संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| १ | श्री.विनयकुमार चौबे,<br>पोलीस आयुक्त,पिपरी चिंचवड. | ९५२९६९१९६६ |
| २ | श्री.मनोज लोहिया,<br>पोलीस सह आयुक्त, पिंपरी चिंचवड. | ७९७७८९०८९७ |

( स्वप्ना गोरे )
पोलीस उप आयुक्त, ( मुख्यालय ) पिंपरी चिंचवड.